लाखो लोकांच्या आयुष्यात समृद्धी आणणारा

# २०० वर्षांचा प्रवास



थोर स्वातंत्र्यसैनिक, सहकारमहर्षी **तीर्थरूप भाऊसाहेब थोरात**
आणि स्वातंत्र्यसेनानी, हरित क्रांतीचे प्रणेते **डॉ. अण्णासाहेब शिंदे**

यांची

# जन्मशताब्दी

दि. ७ ते १२ जानेवारी २०२४ | स्थळ: जाणता राजा मैदान, संगमनेर

निमंत्रक

**सत्यजीत तांबे**
सदस्य, विधानपरिषद

**डॉ. जयश्री थोरात**
युवानेत्या, कॅन्सरतज्ज्ञ

# पुरस्कारार्थी मान्यवर

## स्वातंत्र्यसैनिक भाऊसाहेब थोरात स्मृती पुरस्कार



### समतेचे तत्त्वज्ञान जपणारे मा. आ. उल्हासदादा पवार

सत्तेपेक्षा संघटनेला आणि पदापेक्षा निष्ठेला महत्त्व देणारे ज्येष्ठ काँग्रेस नेते माजी आमदार उल्हास दादा पवार म्हणजे आजच्या राजकीय साठमारीतील दुर्मीळ व्यक्तिमत्व. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समतेचे तत्त्वज्ञान जपण्याचे आणि ते वाढविण्याचे काम दादांनी केले. दादा म्हणजे काँग्रेस पक्षाचा चालता बोलता विश्वकोश आहे. राजकारणाच्या जोडीने पुण्यातील साहित्य, कला आणि सांस्कृतिक क्षेत्राला त्यांनी आपल्या कर्तृत्वाने संपन्न केले आहे.

## हरितक्रांतीचे प्रणेते डॉ. अण्णासाहेब शिंदे स्मृती पुरस्कार

JAIN
Jain Irrigation Systems Ltd.

### शेतीमातीशी नातं सांगणारा 'जैन उद्योग समूह'

शेती आणि मातीच्या सेवेला जीवनध्येय म्हणून काम करणारे थोर गांधीवादी स्व. भवरलाल जैन हे खरे कृषिमहर्षी. जैन उद्योग समूहाचे संस्थापक या नात्याने सिंचनाच्या क्षेत्रात त्यांनी आमूलाग्र क्रांती घडवली. टिश्यूकल्चर, फळबाग आणि कृषी क्षेत्रात क्रांती घडविणारे संशोधन आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात जैन उद्योग समूह गेली साठ वर्षे अव्याहतपणे काम करतो आहे. जैन कुटुंबातील पुढील पिढी ११८ देशांमध्ये व्यवसायाच्या माध्यमातून शेतीची सेवा करत आहे. विविध उपक्रमांच्या माध्यमातून गांधी विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे काम या उद्योग समूहाच्या वतीने सतत चालू आहे.

## सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सेवाभावी संस्था पुरस्कृत सहकारातील आदर्श नेतृत्व पुरस्कार



### सहकाराचे वारकरी आ. पी. एन. पाटील

सहकाराच्या माध्यमातून शेतकरी आणि सभासदांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे काम कोल्हापूर जिल्ह्यातील करवीरचे आमदार पी. एन. पाटील यांनी केले. कोल्हापूर जिल्हा बँक, साखर कारखाना आणि सूतगिरणी या माध्यमातून सहकाराच्या क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरी देदीप्यमान आहे. प्रखर काँग्रेसनिष्ठ नेता आणि कार्यकर्ता घडविणारे विद्यापीठ अशी त्यांची ओळख आहे.

### पुरस्कार निवड समिती

**मा. विजयअण्णा बोराडे**
मराठवाडा शेती साहाय्यक मंडळ, औरंगाबाद

**मा. डॉ. राजीव शिंदे**
प्रख्यात सर्जन, श्रीरामपूर

**मा. उल्हास लाटकर**
अमेय प्रकाशन, पुणे

**मा. उत्कर्षा रुपवते**
सदस्या, महिला आयोग

**मा. केशव जाधव**
मा. प्राचार्य, अमृतवाहिनी मॉडेल स्कूल

**बाबा खरात**
समन्वयक. निवड समिती

# स्वातंत्र्यसैनिक, सहकारमहर्षी तीर्थरूप भाऊसाहेब थोरात आणि स्वातंत्र्यसेनानी, हरित क्रांतीचे प्रणेते डॉ. अण्णासाहेब शिंदे जन्मशताब्दी सोहळा आणि पुरस्कार वितरण कार्यक्रम

■ शुभहस्ते ■

**आदरणीय नामदार श्री. सिद्धरामय्या जी**
मुख्यमंत्री, कर्नाटक

■ अध्यक्ष ■

**आदरणीय श्री. पृथ्वीराज चव्हाण जी**
माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र

■ प्रमुख उपस्थिती ■

**आदरणीय श्री. रमेश चेन्नीथला जी**
प्रभारी, महाराष्ट्र काँग्रेस

**आदरणीय श्री. एच के पाटील**
मंत्री, कर्नाटक

■ सन्माननीय अतिथी ■

**श्री. बाळासाहेब थोरात**
काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते

**श्री. जितेंद्र आव्हाड**
माजी मंत्री, महाराष्ट्र

**श्री. भास्कर जाधव**
शिवसेना नेते

**श्री. डॉ. सुधीर तांबे**
माजी वि.प. सदस्य

**दि. ७ जानेवारी २०२४, दुपारी १ वाजता**
**स्थळ: जाणता राजा मैदान, संगमनेर**

**सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या नूतन कार्यालयीन इमारतीमध्ये आदरणीय भाऊसाहेब थोरात ऊर्फ दादा यांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ कर्नाटकचे मुख्यमंत्री आदरणीय सिद्धरामय्याजी यांच्या शुभहस्ते संपन्न होईल.**

# कला व सांस्कृतिक महोत्सव

## स्थळ: जाणता राजा मैदान, संगमनेर



**सोमवार, दि. ८ जानेवारी २०२४, सायंकाळी ७ वाजता**

### आनंदसोहळा

स्थानिक कलाकारांचा गुणदर्शन कार्यक्रम



**मंगळवार, दि. ९ जानेवारी २०२४, सायंकाळी ७ वाजता**

### खेळ मांडियेला

आदेश बांदेकर प्रस्तुत होम मिनिस्टर



**गुरुवार, दि. ११ जानेवारी २०२४, सायंकाळी ७ वाजता**

### JAVED ALI LIVE IN CONCERT

बॉलिवुड आणि सूफी गाण्यांचा जल्लोष



**शुक्रवार, दि. १२ जानेवारी २०२४, सकाळी ८ वाजता**

### प्रेरणादिन आणि पुष्पांजली कार्यक्रम

बापू तेरे रास्ते...

(सौ. सुरभी आणि श्री. सचिन ढोमणे प्रस्तुत) भजनांचा कार्यक्रम

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात प्रेरणास्थळ, अमृतनगर, घुलेवाडी

# सहकाराचे तीर्थक्षेत्र

## भाऊसाहेब थोरात



**महात्मा गांधीजी यांच्या प्रेरणेतून** आणि **स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली** सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे राज्य निर्माण करण्यासाठी महाराष्ट्रात ज्यांनी प्रयत्न केले, स्व. भाऊसाहेब थोरात त्या पिढीचे प्रतिनिधी होते. गावोगाव सहकारी सेवा सोसायट्यांचे जाळे, शेतकी संघ, दूध उत्पादक संस्था, दूध संघ, सहकारी साखर कारखाना आणि विविध सहकारी संस्था निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. जिल्हा व राज्य सहकारी बँकेत दीर्घकाळ प्रतिनिधित्व आणि नेतृत्वही केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी प्रसंगी स्वतःच्या सरकार विरोधात संघर्ष केला. आरोग्य आणि शिक्षणाच्या सुविधा निर्माण केल्या. संगमनेर आणि परिसराच्या उजाड माळरानावर तीर्थरुप भाऊसाहेब थोरात यांनी नंदनवन फुलवले. **लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी तीर्थरूप भाऊसाहेब थोरात यांचा वारसा नुसता जपलाच नाही, तर विविध संस्था आणि आपल्या कार्यशैलीच्या माध्यमातून संगमनेरचे अर्थशास्त्र आणि समाजकारण बदलवून दाखविले. आज आदरणीय बाळासाहेब थोरात हे राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात राज्य पातळीवर नेतृत्वाची धुरा सांभाळत आहेत..**

**जन्मशताब्दी निमित्ताने तीर्थरूप भाऊसाहेब थोरात यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन!**

**स्वातंत्र्यसैनिक सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात**
**व स्वातंत्र्यसेनानी, हरित क्रांतीचे प्रणेते डॉ. अण्णासाहेब शिंदे**
**संयुक्त जयंती महोत्सव समिती आयोजित**

100

सहकारमहर्षी
भाऊसाहेब थोरात
# जन्मशताब्दी
सहकार, कृषी आणि
शैक्षणिक क्रांतीचा उत्सव
१९२४-२०२४

## सन्मान सोहळा आणि कला व सांस्कृतिक महोत्सव

**स्थळ: जाणता राजा मैदान, संगमनेर**

श्री. / सौ. ______________________________

______________________________